शासन सेवेत सरळसेवेने नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादेत दिनांक ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत शिथिलता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०२६/प्र.क्र.६४/सेवा-१ (का. १२)

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन ४०००३२.
दिनांक : ०५ नोव्हेंबर २०२६.

संदर्भ :-
१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/ का.१२, दि. २५.०४.२०१६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मलोआ-११२६/ प्र.क्र.२३९/ मलोआ, दि. ०४.०९.२०२६.

प्रस्तावना.

राज्यातील विद्यमान भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी उच्चस्तरीय सचिव समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने विहित कमाल वयोमर्यादेत शिथिलता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय.

या शासन निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०१ जानेवारी, २०२६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत पदभरतीकरिता ज्या जाहिराती प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत आणि ज्या जाहिरातींच्या निवड प्रक्रियेचा कोणताही टप्पा पार पडलेला नाही, अशा जाहिरातींकरिता संदर्भ क्र. (१) मधील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५.०४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत एक वर्ष इतकी शिथिलता देण्यात येत आहे; आणि,

२) या शासन निर्णयाच्या दिनांकापासून दिनांक ३१ डिसेंबर, २०२७ पर्यंत पदभरतीकरिता ज्या जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नव्याने प्रसिद्ध होणार आहेत, अशा जाहिरातींकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांना संदर्भ क्र. (१) मधील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५.०४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत एक वर्ष इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्यतिरिक्त भरती परीक्षा आयोजित करणाऱ्या अन्य यंत्रणांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांकरिता देखील वरील अ.क्र. (१) आणि (२) येथे नमूद केलेल्या तरतुदी लागू राहतील.

४) ज्या पदांसाठी संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमात विवक्षित कारणास्तव संदर्भाधीन दिनांक २५.०४.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेपेक्षा भिन्न कमाल वयोमर्यादा विहित केली आहे, अशा पदांसाठी विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत देखील सदर एक वर्ष इतकी शिथिलता देय राहील.

५) यामुळे वरील अ.क्र. (१) अनुसार जे उमेदवार अशा जाहिरातींकरिता अर्ज करण्यास पात्र होत आहेत, त्यांना अर्ज सादर करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विहित कार्यवाही करावी.

६) सदर शिथिलता ही केवळ एक वेळची विशेष बाब म्हणून लागू करण्यात येत असून, दिनांक १ जानेवारी, २०२८ रोजी किंवा त्यानंतर प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकरिता संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमात अथवा संदर्भाधीन क्र. (१) येथील दिनांक २५.०४.२०१६ च्या शासन निर्णयात विहित केलेली कमाल वयोमर्यादाच लागू राहील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०५१४३४१२८७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=522242E2259DBF8FC1AED336674EBF6138607B16AACBBED00301A9E43C62F6C7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=783CA3332598C7E1C28393EA543FA05D9FB77F36A848F4738D12288E105699F4, cn=LEENA ASHISH SANKHE
Date: 2026.11.05 14:36:36 +05'30'

(लिना संखे)
शासनाच्या उपसचिव.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोक भवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई.

प्रत-

१) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई.
२) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
३) निवड नस्ती, सेवा-१/सा.प्र. विभाग.